Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आधारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-२/३९९२
पुणे -४११ ००४
दिनांक : ०१/०७/२०२२

गोपनीय /महत्वाचे/ परीक्षा प्राधान्य

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:-शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इ.१ ली ते इ.१२ वी चा पाठ्यक्रम १००% राबविणेबाबत.
संदर्भ:-शासन निर्णय क्र.अभ्यास-२०२२/प्र.क्र.१०४/एसडी ४ दिनांक २४/६/२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन कळविण्यात येते की, मार्च २०२० पासून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा ऑनलाईन स्वरुपामध्ये सुरु होत्या. तसेच प्रत्यक्ष शाळेत अध्ययन-अध्यापन मर्यादित स्वरुपात होत असल्याने कालावधीमध्ये विद्यार्थ्यांवरील अध्ययनाचा ताण कमी व्हावा यादृष्टिने शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता १ ली ते १२ वी चा पाठ्यक्रम २५% कमी करण्यात आला होता.

परंतु शासन निर्णय क्रमांक अभ्यास-२०२२/प्र.क्र.१०४/एसडी-४ दिनांक २४ जून २०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इयत्ता १ ली ते १२ वी साठी १००% पाठ्यक्रम लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली असल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा १००% अभ्यासक्रमानुसार घेण्यात येणार आहे.

सदर बाब आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या त्वरित निदर्शनास आणावी.

( डॉ.अशोक भोसले )
सचिव
राज्य मंडळ,पुणे-०४.

प्रत माहितीस्तव
१) मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालयं, पुणे-०१
३) मा.संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय,पुणे-०१
४) मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०

क/नाविमं/उमा/अ-१/2187
नाशिक-४२२००३
दिनांक १३/०७/२०२२
15

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुबार.

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्यमंडळाचे वरील पत्रानुसार नोंद घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदरची बाब सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून दयावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक